# वसंतनगर तांड्यांत अग्नी तांडव ! जनावरे जळून खाक ! !


सांज दैनिक बीड

RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव



भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

● बीड ● सोमवार, दिनांक २५ मे २०२६ ● वर्ष २१ वे ● पाने : ४ http://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये


बीड : पाचेगाव तालुका गेवराई जिल्हा बीड येथील वसंतनगर तांडा या ठिकाणी उन्हाची वाढत्या प्रमाणाने अचानक शेतकऱ्याच्या गोट्याला मोठ्या प्रमाणात आग लागून यामध्ये गंज व वासरू गाय घोडा, घोडी व शेळ्या मृत्युमुखी पडलेल्या आहेत . ही आग एवढी भिषण होती की तंड्यामधील ग्रामस्थ सैरावैरा आपला बचाव करण्यासाठी पळत होते . याबाबत प्रशासनास माजी जिल्हा परिषद शामराव गुरुजी राठोड व सरपंच बाळू जाधव ,गोरक्षनाथ राठोड, ज्ञानेश्वर चव्हाण,



एकनाथ राठोड, ज्ञानेश्वर राठोड यांनी कल्पना दिली . यूद्धजितदादा पंडित यांनी अग्निशामक गाड्या तात्काळ पाठवून दिल्या . आग विझवण्याचा प्रयत्न केला परंतु आग एवढी भिषण होती की आग आटोक्यात आणणे मुश्किल होऊन बसले होते . यामुळे ता तांड्यामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले . यामध्ये प्रल्हाद राठोड ,कल्याण राठोड साहेबराव राठोड ,गेम राठोड कैलास राठोड या शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान झालेले .

## तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासनाचा पदभार स्वीकारला !

# केजमध्ये रोज शंभर क्विंटल बनावट खवा तयार होतो ! याप्रकरणी अगोदर संबंधित अधिकाऱ्याला जबाबदार धरून कारवाई करा ! !

- बीड जिल्ह्यातील केज शहराजवळ मागील अनेक वर्षांपासून बनावट खवा तयार केला जातो, यावर आजपर्यंत कारवाई का नाही?
- बीड जिल्ह्यात जनावरांची संख्या कमी, दुष्काळी जिल्हा म्हणून हमखास पाणी टंचाई ! मात्र दूधाची अजिबात कमतरता नाही, ते येते कुठून आणि कसे?
- अन्न भेसळच्या माध्यमातून राजरोस सर्वसामान्यांच्या जीविताशी खेळ खेळला जात असताना अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी

## सर्वसामान्य माणसाला जे दिसते ते भेसळ विभागाला का दिसत नाही, मोतीबिंदू झाला का?

**बीड : प्रतिनिधी**

**धडाडीचे, प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून राज्यात नावलौकीक असलेले तुकाराम मुंढे अखेर आठवडाभराने अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारण्यास राजी झाले आहेत. सोमवारी दुपारी 11 वाजता मुंढे यांनी वांद्रे- कुर्ला संकुलातील अन्न व औषध प्रशासनाच्या राज्य मुख्यालयात आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकारला. मुंढे यांची आठ दिवसांपूर्वी अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्तपदी नियुक्ती झाली होती. त्यापूर्वी त्यांची दिव्यांग सक्षमीकरण विभागातून बदली केल्यानंतर गेले दीड महिना मुंढेंना पदाच्या प्रतीक्षेत ठेवले होते. पसंतीच्या अधिकाऱ्यांकडे दोन दोन खाती आणि मुंढे यांना मात्र घरी बसवल्याने समाज माध्यमांमध्ये चर्चा होऊलागली होती.**



### मुंढे यांच्या बदलीनंतर समाज माध्यमांवर सरकारवर टीकेची झोड उठली होती ! !

● दिव्यांग सक्षमीकरण विभागातून सहा महिन्यात मुंढे यांची बदली करण्यात आली . त्याला कारण राजकीय नेत्यांच्या बोगस दिव्यांग संस्था आणि राज्य शासनात दिव्यांग बनावट प्रमाणपत्रावर नोकऱ्या पटकावलेले अधिकारी यांच्यावर मुढे यांनी कठोर कारवाईचा बडगा उगारला होता .

● मुंढे यांचे समाज माध्यमांवर लाखो पाठीराखे आहेत . मुंढे यांच्या बदलीनंतर समाज माध्यमांवर सरकारवर टीका झाली होती .





### मंत्री, आमदार , अधिकारी आणि ठेकेदार या लॉबीच्या विरोधात गेले की प्रामाणिक अधिकाऱ्यांना बदलीची शिक्षा!!

● मुंढे यांच्या २० वर्षांच्या कालावधीत २५ बदल्या झाल्या आहेत . आयएएस अधिकाऱ्याची बदली मुख्यमंत्र्यांच्या सहीशिवाय होत नाही .

● मुंढे यांना आपल्या विभागाचे सचिवपद देण्यास बहुतांश मंत्र्यांचा विरोध आहे . ज्या मंत्र्यांनी दिव्यांग सक्षमीकरण विभाग स्थापन करण्यास पुढाकार घेतला होता, त्यानांच मुंढे नकोसे झाले होते . त्यामुळे मुंढे यांना सहा महिन्यात बदलीस सामोरे जावे लागले .

● मंत्री, आमदार, अधिकारी आणि ठेकेदार यांचे मंत्रालयात साटेलोटे आहे .

● या लॉबीच्या विरोधात गेल्यास प्रामाणिक अधिकाऱ्यांना बदलीची शिक्षा दिली जाते . मुंढे त्याचेच बळी ठरलेले अधिकारी आहेत .

### केज शहरात रोज शंभर क्विंटल बनावट खवा तयार होतो, कोणाच्या परवानगीने?

**मागील अनेक वर्षांपासून केज शहराजवळ असलेल्या उमरी शिवारातील एका शेतात रोज शंभर ते दीडशे क्विंटल बनावट खावा राजरोस तयार करून त्याचे वितरण महाराष्ट्रभर होते. ही बाब केज शहरापुरती मर्यादित राहिली नसून ती संपूर्ण बीड जिल्ह्याला माहित असताना अन्न व औषध प्रशासनाला हे कसे काय माहित नाही? तसेच बीड जिल्ह्यात राजरोस बनावट दूध विक्रीचा गोरख धंदा तेजित आहे. मात्र, याकडेही अन्न व औषध प्रशासनाचे दुर्लक्ष का व कशासाठी? आजपर्यंत बनावट खावा विक्रेत्यांवर अन्न व औषध प्रशासनाने कारवाई केलेली दिसून येत नाही. तसेच भेसळ करणाऱ्या कोणत्याही व्यावसायिकावर अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई केल्याची साधी नोंद नाही, या व अशा संतप्त प्रतिक्रिया असून बीडच्या अन्न व औषध प्रशासनाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. एकूणच तुकाराम मुंडे साहेबांनी सर्वप्रथम त्यांच्या बीड येथील अन्न औषध अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करणे अपेक्षित असल्याच्या भावना सर्वसामान्य नागरिकांमधून व्यक्त होत आहे.**

---

संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाची पुनरावृत्ती? ➤ मातंग समाजाच्या उमेश दळवी ची क्रूरपणे हत्या!

# धक्कादायक घटनेने पुन्हा एकदा बीड हादरले!

**अवैध रित्या दारू विक्री असणाऱ्या दुकानदार मालकाकडून मारहाण;मारहाणीत 35 वर्षीय तरुणाचा मृत्यू.**

**बीडच्या शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील घटना; शेख इरफान उर्फ लाला याच्यावर खुन -अट्रोसिटीचा गुन्हा**

बीड / प्रतिनिधी :

बीड शहरातील बालेपीर नगर रोड परिसरात दुकानातील किरकोळ वादातून एका 35 वर्षीय युवकाचा निर्घृण खून झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे . या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी शेख इरफान शेख समद उर्फ लाला याच्यावर अॅट्रॉसिटीसह विविध गंभीर कलमांखाली गुन्हा नोंद करण्यात आला आहे .

मृत उमेश दळवी ( वय 35, रा . गोरे वस्ती, बालेपीर रोड, बीड ) हे शेख इरफान उर्फ लालाच्या अवैधरित्या



चालणाऱ्या दारूच्या दुकानावर काम करत होते . फिर्यादी संगिता उमेश दळवी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, 23 मे रोजी सकाळी उमेश कामावर जात असताना त्यांनी पत्नीला दुकानाच्या हिशोबावरून मालक शेख इरफान हा वारंवार धमक्या देत असल्याचे सांगितले होते . पैसे न दिल्यास मारून टाकण्याची धमकी आरोपीकडून दिली जात असल्याचाही उल्लेख तक्रारीत करण्यात आला आहे .

त्याच दिवशी रात्री 8 :30 च्या दरम्यान उमेश यांच्याशी त्याच्या पत्नीचा फोनवर संपर्क झाला होता . मात्र त्यानंतर ते घरी परतले नाहीत . दरम्यान, 24 मे रोजी पहाटे 3 च्या सुमारास उमेश च्या पत्नीला एका व्यक्तीकडून फोन करून उमेश यांना बालेपीर नगर रोडवरील मेहबूबनर्सरी जवळून शेख इरफान उर्फ लाला च्या दुकानातून अंबुलन्स मध्ये टाकून बीड जिल्हा शासकीय रुग्णालय येथे नेले आहे अशी माहिती देण्यात आली . त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते . मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले .

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, उमेश यांच्या शरीरावर मारहाणीच्या जखमा होत्या . दुकानातील आर्थिक व्यवहार व हिशोबाच्या वादातूनच आरोपी शेख इरफान उर्फ लाला याने हा खून केल्याचा आरोप करण्यात आला आहे . विशेष म्हणजे, पीडित कुटुंब अनुसूचित समाजातील असल्याची माहिती असूनही आरोपीने जाणीवपूर्वक मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे .

---

# ब्लॅकमेल करून महिलेवर अत्याचार;माजी पंचायत समिती सभापतीच्या मुलाचा प्रताप!

**➤ शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील घटना; अमर बांगर विरुद्ध गुन्हा दाखल**

➤ बीड / प्रतिनिधी :

बीड जिल्ह्यातील पाटोदा पंचायत समिती माजी सभापतीचा मुलगा असलेल्या अमर किरण बांगर याने एका विवाहित महिलेला ब्लॅकमेल करून तिच्यावर वारंवार बलात्कार केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे . याप्रकरणी पीडित महिलेने शिवाजीनगर पोलीस ठाण्यात धाव घेऊन रीतसर तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी अमर बांगर याच्या विरुद्ध विविध कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे .

बीड शहरातील चऱ्हाटा रोड भागात राहणाऱ्या आणि हल्ली शहादा जि नंदुरबार येथे वास्तव्यास असलेल्या महिलेवर अमर बांगर याने बीड व नंदुरबार येथे वारंवार बळजबरी केली . तक्रार देण्याचा प्रयत्न केल्यास जीवे मारण्याची धमकी देखील दिली गेली . आरोपी अमर बांगर हा पीडित महिलेला सातत्याने ब्लॅकमेल करत होता . एवढेच नव्हे तर, त्याने महिलेला गुंगीचे औषध देऊन तिच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेतला आणि तिच्यावर पाशवी अत्याचार केले .

या नराधमाचे कृत्य एवढ्यावरच थांबले नाही . त्याने पीडित महिलेला धमकावून तिच्याकडून आणि तिच्या कुटुंबाकडून मोठ्या प्रमाणावर पैशांची मागणी केली . कुटुंबाची बदनामी होऊ नये म्हणून पीडितेच्या कुटुंबाने आरोपीला प्रचंड पैसा दिला, मात्र त्याचा छळ थांबला नाही . अखेर या त्रासाला कंटाळून पीडितेने पोलिसांत न्याय मागितला आहे .

आरोपी अमर बांगर हा बीड जिल्ह्यातील पाटोदा पंचायत समिती माजी पंचायत समिती सभापती चा मुलगा असल्याची माहिती समोर येत आहे . माजी सभापतींचा मुलगा असल्याने या प्रकरणाला राजकीय वळण लागण्याची शक्यता आहे . गुन्हा दाखल होताच आरोपीच्या शोधासाठी पोलीस पथके रवाना झाल्याची देखील माहिती मिळत आहे .

शिवाजीनगर पोलिसांनी याप्रकरणी बलात्कार, खंडणी आणि गुंगीचे औषध देऊन शोषण करणे या कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे . आरोपीच्या शोधासाठी पोलीस पथके रवाना झाली आहेत . मात्र आरोपीच्या वडिलांची राजकीय पार्श्वभूमी पाहता पोलीस किती तत्परतेने कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे .

# आजचे राशि भविष्य

## मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वतःच्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास


➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# NEET घोटाळ्यात युवकांचं भविष्य जळत असताना ‘कॉकरोच पार्टी’चा तमाशा कशासाठी?

विशेष




श्रध्दा यादव (सवंडकर)
Yshraddha477@gmail.com


देशातील लाखो विद्यार्थी दिवस-रात्र अभ्यास करून, कुटुंबाची परिस्थिती सांभाळून, मोठी स्वप्नं डोळ्यांत घेऊन NEET सारख्या परीक्षांची तयारी करतात. आई-वडील कर्ज काढतात, फी भरतात, मुलांनी डॉक्टर व्हावं म्हणून स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवतात. पण आज त्या विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ झाल्याची भावना संपूर्ण देशात निर्माण झाली आहे.

NEET परीक्षेतील कथित गैरव्यवहार, पेपरफुटी, गुणांबाबतचे प्रश्न, संशयास्पद प्रकार आणि त्यात समोर येणारी मोठमोठी नावं यामुळे विद्यार्थी आणि पालक हादरले आहेत. लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा प्रश्न असताना देशातील माध्यमांनी आणि सोशल मीडियाने कोणत्या विषयावर चर्चा करायला हवी होती? विद्यार्थ्यांच्या भविष्यावर? शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचारावर? की बेरोजगार तरुणांच्या चिंतेवर?

पण सध्या काय चाललंय? “कॉकरोच पार्टी” नावाचा एक हास्यास्पद आणि बिनबुडाचा विषय सोशल मीडियावर उचलून धरला जातोय. काही लोकांचे फॉलोअर्स आहेत, काही reels viral होतात म्हणून तो अधिकृत राजकीय पक्ष होत नाही. कोणत्याही पक्षाला मान्यता देण्याचा अधिकार हा भारताच्या Election Commission of India कडे असतो. सोशल मीडियावर नाव ट्रेंड झालं म्हणजे पक्ष स्थापन झाला, अशी समज पसरवणं म्हणजे लोकांची दिशाभूलच आहे.









प्रश्न फक्त “कॉकरोच पार्टी”चा नाही. प्रश्न आहे प्राधान्यांचा. देशात युवक बेरोजगार आहेत. स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी नैराश्यात आहेत. शेतकऱ्यांची मुलं शिक्षणासाठी संघर्ष करत आहेत. अनेक तरुण नोकरी नसल्यामुळे घर चालवण्यासाठी छोट्या-मोठ्या कामांकडे वळत आहेत. आणि अशा वेळी माध्यमांनी खऱ्या प्रश्नांवर आवाज उठवण्याऐवजी लोकांना निरर्थक चर्चांमध्ये अडकवून ठेवायचं?

आजचा तरुण मूर्ख नाही. त्याला समजतंय की कोणते मुद्दे मुद्दाम पुढे आणले जात आहेत आणि कोणते प्रश्न दाबले जात आहेत. NEET घोटाळ्याबद्दल देशभरात संताप असताना अचानक “कॉकरोच पार्टी” सारख्या विषयाला मिळणारी प्रसिद्धी अनेक प्रश्न निर्माण करते. युवकांच्या भविष्यावर चर्चा होऊ नये म्हणून हा विषय पुढे आणला जातोय का, असा प्रश्न सामान्य लोक विचारत आहेत.

माध्यमांनी TRP साठी नव्हे तर जबाबदारीने पत्रकारिता करायला हवी. विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न हा कोणत्याही विनोदी किंवा व्हायरल विषयापेक्षा हजारपट मोठा आहे. लाखो मुलांच्या आयुष्याशी संबंधित विषय बाजूला ठेवून निरर्थक तमाशा दाखवणं म्हणजे समाजाची दिशाभूल करणं आहे. देशातील युवकांना आज मनोरंजनापेक्षा उत्तरं हवी आहेत. पेपरफुटी का झाली? विद्यार्थ्यांच्या मेहनतीचं काय? भविष्याशी खेळ करणाऱ्यांवर कारवाई कधी होणार? या प्रश्नांची उत्तरं देणं महत्त्वाचं आहे — “कॉकरोच पार्टी”चा तमाशा उभा करणं नाही.

कारण शेवटी, व्हायरल reels पोट भरत नाहीत आणि खोट्या चर्चांमुळे करिअर घडत नाही. युवकांचं भविष्य वाचवायचं असेल, तर खऱ्या प्रश्नांवर बोलावंच लागेल.

# ‘चिरैया’: संमतीच्या प्रश्नावर थेट बोट ठेवणारा चित्रपट

विशेष





डॉ संध्या मोहिते
drsandhyagm@gmail.com


भारतात स्त्रीच्या संमतीचा प्रश्न आजही अत्यंत गुंतागुंतीचा आणि वेदनादायी वास्तव आहे. विशेषतः विवाहसंस्थेमध्ये स्त्रीची इच्छा, तिचे मन, तिचा नकार — यांना अनेकदा दुय्यम स्थान दिले जाते. “लग्न झाले म्हणजे पत्नीवर पतीचा अधिकार” ही पिढ्यान्पिढ्या चालत आलेली मानसिकता अजूनही समाजाच्या मुळाशी घट्ट बसलेली आहे. त्यामुळेच वैवाहिक बलात्कारासारख्या गंभीर विषयावर कायदेशीर आणि सामाजिक पातळीवर अजूनही स्पष्ट संवेदनशीलता दिसून येत नाही.

भारतीय कायद्यात आजही “मॅरिटल रेप” म्हणजेच वैवाहिक बलात्कार स्वतंत्र गुन्हा म्हणून पूर्णपणे मान्य केलेला नाही. भारतीय दंड संहितेतील अपवादात्मक तरतुदीनुसार, पत्नीचे वय विशिष्ट मर्यादेपेक्षा अधिक असेल तर पतीकडून तिच्या इच्छेविरुद्ध ठेवलेले लैंगिक संबंध बलात्कार समजले जात नाहीत. ही तरतूद केवळ कायदेशीर नाही, तर सामाजिक विचारसरणीचेही प्रतिबिंब आहे. यात स्त्रीला स्वतंत्र व्यक्ती म्हणून नव्हे, तर विवाहसंस्थेतील एक “कर्तव्यबद्ध” घटक म्हणून पाहिले जाते.







याच वास्तवावर भाष्य करणारा ‘चिरैया’ हा चित्रपट (वेब सीरीज) अत्यंत संवेदनशील पद्धतीने स्त्रीच्या संमतीचा प्रश्न मांडतो. हा चित्रपट केवळ एका स्त्रीची कथा सांगत नाही, तर भारतीय समाजातील त्या हजारो स्त्रियांचे प्रतिनिधित्व करतो ज्या विवाहाच्या चौकटीत स्वतःचा आवाज हरवून बसतात. चित्रपटात दाखवलेली तरुण वधू एका अशा वैवाहिक नात्यात अडकलेली आहे जिथे तिच्या भावनांपेक्षा आणि इच्छेपेक्षा “कौटुंबिक प्रतिष्ठा” अधिक महत्त्वाची मानली जाते. तिचे मौन हे तिची स्वीकृती समजले जाते, आणि इथेच चित्रपट प्रेक्षकांना अस्वस्थ करणारे पण आवश्यक प्रश्न विचारतो.

‘दिव्या दत्ता’ यांनी साकारलेली भूमिका स्त्रीच्या अंतर्मनातील घुसमट, भीती आणि आत्मसन्मानासाठी चाललेला संघर्ष अत्यंत प्रभावीपणे उभी करते. दिग्दर्शकाने कुठेही अतिरेकी नाट्यमयता न आणता, वास्तववादी आणि संयमी शैलीत हा विषय हाताळला आहे. त्यामुळे चित्रपट केवळ कथा राहत नाही, तर एक सामाजिक संवाद बनतो.

प्रश्न केवळ कायद्याचा नाही; तो स्त्रीच्या अस्तित्वाचा आहे. लग्नानंतर स्त्रीची संमती कायमस्वरूपी मिळाली आहे असे गृहीत धरणे, हे तिच्या शरीरस्वातंत्र्याचे उल्लंघन आहे. संमती ही प्रत्येक वेळी आवश्यक असते — मग नाते कोणतेही असो. प्रेम, विवाह किंवा नातेसंबंध यांचा अर्थ अधिकार नसून परस्पर आदर आणि स्वीकृती असतो. स्त्रीचे मौन म्हणजे संमती नाही, आणि विवाह म्हणजे तिच्या इच्छेवरचा कायमस्वरूपी शिक्का नाही.

भारतीय समाजात अनेक स्त्रिया अजूनही अशा नात्यांत जगत आहेत जिथे त्या मानसिक, भावनिक आणि शारीरिक दडपणाखाली असतात. त्या आवाज उठवत नाहीत कारण त्यांना “घर टिकवण्याची जबाबदारी” शिकवली जाते. समाज अजूनही विचारतो — “पती आहे, मग यात चुकीचे काय?” पण हाच प्रश्न स्त्रीच्या वेदनांकडे दुर्लक्ष करतो. तिच्या मनाविरुद्ध घडणारी कोणतीही गोष्ट ही अत्याचारच असते.

अशा कथा, मालिका आणि चित्रपट समाजाला आरसा दाखवतात. ‘चिरैया’ सारखे चित्रपट केवळ मनोरंजन करण्यासाठी नव्हे तर अनेक स्त्रियांच्या न बोलल्या गेलेल्या वेदनांना आवाज देतात. वैवाहिक बलात्कारासारख्या विषयांवर खुली चर्चा होणे, स्त्रीच्या आत्मसन्मानाला मान्यता मिळणे आणि संमतीला वैवाहिक नात्याचाही पाया मानणे — ही काळाची गरज आहे.

स्त्री ही कोणाची मालमत्ता नाही. तिचे शरीर, तिची इच्छा आणि तिचा नकार — हे तिचे मूलभूत मानवी अधिकार आहेत. आणि जोपर्यंत समाज व कायदा हे पूर्णपणे स्वीकारत नाहीत, तोपर्यंत खरी समानता आणि स्वातंत्र्य अपूर्णच राहील.

# बॉलिवूडची ‘ड्रामा क्वीन’ राखी सावंत झाली भावूक; “आजपर्यंत मला खरं प्रेमच मिळालं नाही”

मुंबई : बॉलिवूडची ‘ड्रामा क्वीन’ राखी सावंत हिने तिच्या वैयक्तिक आयुष्याबाबत मोठे खुलासे केले आहेत. दोन अपयशी विवाह, प्रेमातील फसवणूक आणि माजी पतीवर केलेल्या गंभीर आरोपांमुळे राखी पुन्हा चर्चेत आली आहे. एका पॉडकास्टमध्ये बोलताना तिने आयुष्यात कधीच खरं प्रेम मिळालं नसल्याची खंत व्यक्त केली.



## दोन लग्नं, दोन घटस्फोट; राखी सावंतची प्रेमकहाणी अपूर्णच

राखी सावंतने सांगितले की, तिच्या आयुष्यात अनेक चढ-उतार आले. २०१९ मध्ये तिने रितेश सिंहसोबत लग्न केले होते. दोघेही लोकप्रिय रिॲलिटी शो बिग बॉसमध्ये एकत्र झळकले होते. मात्र, २०२२ मध्ये या नात्याचा शेवट झाला. त्यानंतर त्याच वर्षी राखीने आदिल खान दुर्रानीसोबत दुसरे लग्न केले. हे नातेही फार काळ टिकू शकले नाही. काही महिन्यांतच दोघांचा घटस्फोट झाला. त्यावेळी दोघांनी एकमेकांवर अनेक गंभीर आरोप केले होते.

## “लोक मला वाइफ मटेरियल मानत नाहीत”

एका पॉडकास्टमध्ये बोलताना राखी सावंत म्हणाली, “लोक मला पत्नी म्हणून योग्य समजत नाहीत. मी स्पष्टवक्ती आहे, स्वतःच्या पायावर उभी आहे आणि माझं आयुष्य माझ्या अटींवर जगते. कदाचित याच कारणामुळे मला लग्नासाठी कोणी पसंत करत नाही.” तिने पुढे सांगितले की, समाजात अनेक मुलींना सहज स्वीकारले जाते, मात्र तिच्यासारख्या स्पष्टपणे मत मांडणाऱ्या महिलेला योग्य जोडीदार मिळणे कठीण जाते. यामुळे तिला अनेकदा मानसिक वेदना सहन कराव्या लागतात.

## आवडत्या व्यक्तीनेही लग्नासाठी दिला नकार

राखीने मुलाखतीत आणखी एक धक्कादायक खुलासा केला. काही दिवसांपूर्वी तिने स्वतः एका व्यक्तीला लग्नासाठी विचारले होते. मात्र त्या व्यक्तीने तिला थेट नकार दिला. राखी म्हणाली, “मी एका मुलाला लग्नाबद्दल विचारलं. त्यावर तो म्हणाला, ‘तुझ्याशी लग्न कोण करेल?’ मी कारण विचारलं तर त्याने सांगितलं की तू वाइफ मटेरियल नाहीस. आजही मला समजत नाही की लोकांच्या मते पत्नी होण्यासाठी नेमकं काय असावं लागतं.”



## आईच्या आग्रहामुळे चुकीच्या व्यक्तीशी लग्न

राखीने सांगितले की, तिच्या आईच्या सल्ल्यानुसार तिने भविष्यासाठी एग्स फ्रीज करून ठेवले होते. यासाठी तिला अनेक इंजेक्शन, मोठा खर्च आणि शारीरिक त्रास सहन करावा लागला. कारण तिला भविष्यात आई बनायचे आहे. मात्र, आईच्या सततच्या आग्रहामुळे तिने घाईघाईत चुकीच्या व्यक्तीसोबत लग्न केल्याचा दावा केला. “आई सतत लग्न कर, लग्न कर असं सांगत होती. त्या दबावात मी चुकीचा निर्णय घेतला. नंतर लक्षात आलं की तो माणूस माझ्यासाठी योग्य नव्हता,” असे ती म्हणाली.

## आदिल खान दुर्रानीवर गंभीर आरोप

राखी सावंतने तिचा माजी पती आदिल खान दुर्रानीवर गंभीर आरोप करताना सांगितले की, विवाहानंतर तिला शारीरिक आणि मानसिक छळ सहन करावा लागला. “तो मला मारहाण करायचा, मानसिक त्रास द्यायचा आणि सतत टॉर्चर करायचा. त्याची वागणूक अशी होती की एखादी व्यक्ती स्वतःहून आत्महत्येचा विचार करेल. एकदा तो मला एका ठिकाणी घेऊन गेला होता. त्यावेळी त्याचा हेतू मला समजला आणि मी तिथून पळून गेले,” असा दावा राखीने केला. तिने पुढे आरोप केला की, “माझ्या संपत्तीवर डोळा ठेवून तो मला संपवण्याचा प्रयत्न करत होता. त्याने माझे सुमारे ३ कोटी रुपयेही घेतले.”

## पुन्हा एकदा चर्चेत राखी सावंत

राखी सावंतच्या या धक्कादायक खुलाशांमुळे तिच्या वैयक्तिक आयुष्याची चर्चा पुन्हा रंगली आहे. दोन अपयशी विवाह, प्रेमातील निराशा आणि माजी पतीवर केलेले गंभीर आरोप यामुळे राखी सावंत पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. तिच्या म्हणण्यानुसार, ती आजही खरं प्रेम आणि आयुष्यभर साथ


सांजदैनिक बीड · वास्तव

सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

## विशेष



## आंबेनळी घाटात भीषण अपघात; ७०० फूट दरीत स्कॉर्पिओ कोसळून ८ तरुणांचा मृत्यू

रायगड : रायगड आणि सातारा जिल्ह्यांच्या सीमेवर असलेल्या महाबळेश्वर-पोलादपूर मार्गावरील धोकादायक आंबेनळी घाटात रविवारी पहाटे भीषण अपघात घडला. प्रवाशांनी भरलेली एक स्कॉर्पिओ जिप अनियंत्रित होऊन तब्बल ५०० ते ७०० फूट खोल दरीत कोसळल्याची घटना समोर आली आहे. या भीषण दुर्घटनेत वाहनातील सर्व ८ तरुणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली असून, मृत सर्वजण सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील आसगाव गावचे रहिवासी असल्याचे सांगितले जात आहे.

विशेष म्हणजे, २०१८ मध्ये दापोली कोकण कृषी विद्यापीठाच्या बसला ज्या ठिकाणी भीषण अपघात झाला होता, त्याच परिसरात हा अपघात घडल्याने पुन्हा एकदा आंबेनळी घाटाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

### पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास घडली दुर्घटना

मिळालेल्या माहितीनुसार, हा अपघात रविवारी पहाटे सुमारे २:४५ वाजता घडला. आसगाव येथील आठ तरुण स्कॉर्पिओ जिपमधून प्रवास करत होते. आंबेनळी घाटातील एका तीव्र आणि धोकादायक वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने गाडी थेट दरीत कोसळली. घाटातील अंधार, खोल दरी आणि कठीण भौगोलिक परिस्थितीमुळे अपघात अधिक भीषण होता. वाहन दरीत कोसळल्यानंतर मोठा आवाज झाला. मात्र दरी अत्यंत खोल असल्याने वाहनापर्यंत पोहोचणे आणि परिस्थितीचा अंदाज घेणे सुरुवातीला कठीण झाले.

### बचावकार्यात अनेक पथकांचा सहभाग

अपघाताची माहिती मिळताच पोलादपूर पोलीस, स्थानिक प्रशासन आणि विविध बचाव पथके तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. दरीची खोली ५०० ते ७०० फूट असल्याने बचाव आणि शोधमोहीम राबवताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

महाबळेश्वर रेस्क्यू टीम, प्रतापगड रेस्क्यू टीम, सिस्केप महाड-पोलादपूर, आपदा मित्र तसेच स्थानिक स्वयंसेवक आणि मदत पथके घटनास्थळी कार्यरत आहेत. बचाव पथकाने दरीत उतरून शोधमोहीम सुरू केली असून, आतापर्यंत दोन मृतदेह बाहेर काढण्यात यश आले आहे. उर्वरित मृतदेहांचा शोध घेण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या दुर्घटनेची माहिती समोर येताच आसगाव गावासह संपूर्ण कोरेगाव तालुक्यात शोककळा पसरली आहे. एका गावातील आठ तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने गावकऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. अपघाताचे नेमके कारण काय होते, याचा तपास पोलीस प्रशासनाकडून सुरू करण्यात आला असून, पुढील चौकशीनंतर अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे. दरम्यान, आंबेनळी घाटातील धोकादायक वळणे, खोल दऱ्या आणि वारंवार घडणारे अपघात लक्षात घेता या मार्गावरील सुरक्षाव्यवस्था अधिक मजबूत करण्याची मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे.

# खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना दुसऱ्यांदा 'संसद रत्न पुरस्कार' जाहीर

**कल्याण : प्रतिनिधी**

देशातील संसदेतील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खासदारांना दिला जाणारा प्रतिष्ठेचा "संसद रत्न पुरस्कार २०२६" यंदा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना जाहीर झाला आहे. विशेष म्हणजे दुसऱ्यांदा त्यांना हा सन्मान प्राप्त होत असून, २०२४ नंतर पुन्हा एकदा त्यांच्या संसदीय कामगिरीची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे. संसदेत नागरिकांच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडणे, देशहिताच्या विषयांवर अभ्यासपूर्ण मांडणी करणे, विकास, आरोग्य, पायाभूत सुविधा, युवक, रोजगार, शहरी प्रश्न प्रभावीपणे मांडणे. याचबरोबर त्यांनी एक वर्षाच्या कालावधीत त्यांनी मांडलेल्या सहा महत्त्वाच्या खासगी विधेयकांच्या अनुषंगाने त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.



संसद रत्न पुरस्कार समितीच्या घोषणेनुसार, यंदा देशभरातील १० लोकसभा खासदार, २ राज्यसभा खासदार आणि ४ संसदीय समित्यांमधील खासदारांची निवड करण्यात आली आहे. या निवड प्रक्रियेमध्ये खासदारांची संसदेतील उपस्थिती, चर्चांमधील सहभाग, विचारलेल्या प्रश्नांची गुणवत्ता, जनहिताच्या मुद्द्यांवरील सातत्यपूर्ण पाठपुरावा, खासगी विधेयक आणि संसदीय योगदानाचा व्यापक आढावा घेतला जातो.

संसद रत्न पुरस्काराची स्थापना २०१० साली 'प्राईम पॉईंट फाऊंडेशन' या संस्थेमार्फत करण्यात आली होती. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या सूचनेनंतर या पुरस्काराला सुरुवात झाली. संसदीय लोकशाही अधिक सक्षम व्हावी, लोकप्रतिनिधींनी संसदेमध्ये प्रभावीपणे जनतेचे प्रश्न मांडावेत आणि सकारात्मक संसदीय परंपरांना प्रोत्साहन मिळावे हा या पुरस्कारामागील मुख्य उद्देश आहे.

या पुरस्कारासाठी निवड करताना संसदेतील अधिकृत आकडेवारी, पीआरएस लेजिस्लेटिव्ह रिसर्च, लोकसभा आणि राज्यसभा सचिवालयातील माहितीचा आधार घेतला जातो. ज्युरीमध्ये माजी संसदीय अधिकारी, घटनातज्ज्ञ आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा समावेश असतो. त्यामुळे संसद रत्न पुरस्कार हा संसदीय क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठेचा आणि विश्वासार्ह सन्मान मानला जातो.

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी गेल्या काही वर्षांत संसदेत सातत्याने सक्रिय भूमिका बजावत महाराष्ट्र आणि विशेषत: कल्याण लोकसभा मतदारसंघाशी संबंधित अनेक प्रश्न प्रभावीपणे मांडले. रेल्वे, वाहतूक, आरोग्य सुविधा, शहरी विकास, पायाभूत सुविधा, रोजगार निर्मिती, युवकांचे प्रश्न, पर्यावरण तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित मुद्द्यांवर त्यांनी सातत्याने आवाज उठवला.

देशाच्या विकासाला गती देणाऱ्या विविध धोरणांवर सकारात्मक चर्चा करताना जनतेच्या अडचणी देखील ठामपणे मांडण्याची त्यांची शैली संसदेत विशेष लक्षवेधी ठरली. अभ्यासपूर्ण मांडणी, सातत्यपूर्ण पाठपुरावा यामुळे दुसऱ्यांदा हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. महाराष्ट्रासाठी देखील ही अभिमानाची बाब असून, यंदाच्या संसद रत्न पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील पाच मान्यवरांना स्थान मिळाले आहे. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना जाहीर झालेल्या या सन्मानाबद्दल विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या संसदीय कार्याची ही राष्ट्रीय पातळीवरील पोचपावती आहे.

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी गेल्या एका वर्षात संसदेमध्ये विविध सामाजिक, शैक्षणिक, तांत्रिक, कायदेशीर आणि जनकल्याणाशी संबंधित ६ महत्त्वपूर्ण खासगी विधेयके मांडत अभ्यासपूर्ण आणि लोकाभिमुख भूमिका अधोरेखित केली. संसद रत्न पुरस्कार २०२६ साठी त्यांच्या निवडीमध्ये या प्रभावी संसदीय कामगिरीची विशेष दखल घेण्यात आली आहे. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी संसदेत डीपफेकसारख्या आधुनिक तांत्रिक धोक्यांवर नियंत्रण आणण्यासाठी "डीपफेक नियमन विधेयक", नैसर्गिक आपत्तीग्रस्तांच्या मदत व पुनर्वसनासाठी "राष्ट्रीय नैसर्गिक आपत्ती प्रतिबंध व आपत्तीग्रस्त कल्याण मंडळ विधेयक", गोसंवर्धन आणि संरक्षणासाठी "गोसंवर्धन व संरक्षण विधेयक", अनाथ मुलांच्या कल्याण आणि विकासासाठी "अनाथ बालक कल्याण व विकास विधेयक", शिक्षण व्यवस्थेतील आवश्यक सुधारणा करण्यासाठी "मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क सुधारणा विधेयक" तसेच कायदा व्यवस्थेशी संबंधित महत्त्वपूर्ण बदलांसाठी "अधिवक्ता सुधारणा विधेयक" संसदेत सादर केले.

ऑपरेशन सिंदूरनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा जगासमोर मांडण्यासाठी भारत सरकारने विविध देशांमध्ये सर्वपक्षीय शिष्टमंडळे पाठवली होती. त्यापैकी एका महत्त्वाच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केले. संयुक्त अरब अमिराती (UAE), लायबेरिया, सिएरा लिओन आणि डेमोक्रेटिक रिपब्लिक ऑफ काँगो या देशांच्या दौऱ्यावर जाऊन त्यांनी भारताची दहशतवादाविरोधातील ठाम भूमिका प्रभावीपणे मांडली. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद, राष्ट्रीय सुरक्षा आणि भारताची 'झिरो टॉलरन्स टू टेररिझम' ही भूमिका आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

संसदेतील प्रभावी कामगिरीबरोबरच जागतिक स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करत देशहिताची भूमिका ठामपणे मांडणे, ही खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या संसदीय कारकिर्दीतील एक महत्त्वपूर्ण आणि उल्लेखनीय कामगिरी आहे.

# पेट्रोल-डिझेल पुन्हा महागलं! सलग चौथ्यांदा झाली दरवाढ

**नवी दिल्ली :** देशभरातील वाहनधारकांना पुन्हा एकदा महागाईचा फटका बसला आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींमध्ये ११ दिवसांत चौथ्यांदा वाढ करण्यात आली आहे. आज २५ मे २०२६ रोजी सकाळी इंधनाच्या दरात वाढ जाहीर झाली. दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नईसह अनेक प्रमुख शहरांमध्ये इंधनाचे दर आणखी वाढले आहेत. नव्या दरांची अंमलबजावणी आज सकाळी ६ वाजल्यापासून करण्यात आली.



यामुळे खासगी वाहनचालकांसह वाहतूक क्षेत्रावरही अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. काही शहरांमध्ये पेट्रोलच्या दरात ३ रुपयांपेक्षा जास्त वाढ झाली असून डिझेलही महागले आहे. राजधानी दिल्लीत पेट्रोल प्रतिलिटर २.६१ रुपयांनी वाढून १०२.१२ रुपये झाले आहे. तर डिझेलच्या दरात २.७१ रुपयांची वाढ झाल्याने ते ९५.२० रुपये प्रतिलिटरवर पोहोचले आहे. त्यामुळे वाहनाची टाकी भरताना ग्राहकांना आता अधिक पैसे मोजावे लागणार आहेत.

दोन आठवड्यांत तब्बल ७.५० रुपयांहून अधिक वाढ

गेल्या दोन आठवड्यांत इंधन दरवाढीचा हा चौथा निर्णय आहे. १५ मे रोजी तब्बल चार वर्षांनंतर पेट्रोल-डिझेलच्या दरात प्रतिलिटर ३ रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली होती. त्यानंतर १९ मे आणि २३ मे रोजीही जवळपास ९० पैशांची वाढ करण्यात आली. १५ मेपासून सुरू झालेल्या या दरवाढीच्या मालिकेमुळे आतापर्यंत पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींमध्ये एकूण ७.५० रुपयांपेक्षा अधिक वाढ झाली आहे. परिणामी सर्वसामान्यांच्या खिशावरील भार वाढण्याची शक्यता असून वाहतूक खर्च वाढल्याने इतर वस्तूंच्या किमतींवरही परिणाम होऊ शकतो.

**शेतकरी मेळावा व पुरस्कार वितरण**

# उंदरीत २६ व २७ मे रोजी खरीप पिक परिसंवाद

**वडवणी / प्रतिनिधी :**


कर्मयोगी डॉ. बालासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या अकराव्या पुण्यस्मरणानिमित्त उंदरी (ता. केज) येथे २६ व २७ मे रोजी खरीप पिक परिसंवाद, आत्मभान जागृती कार्यक्रम, शेतकरी मेळावा व पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.




२६ मे रोजी सायंकाळी खरीप पिक परिसंवाद व आत्मभान जागृती कार्यक्रम होणार असून विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तर २७ मे रोजी स्मृती भवन येथे शेतकरी मेळावा व पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे.

यावेळी कृषी, सामाजिक, पत्रकारिता, आरोग्य, पर्यावरण व साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आठ मान्यवरांना कर्मयोगी डॉ. बालासाहेब ठोंबरे-पाटील स्मृती पुरस्कारांसह विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येणार आहे. राज्यभरातील मान्यवरांची उपस्थिती लाभणाऱ्या या कार्यक्रमास बीडसह मराठवाड्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्रीमती प्रभावती ठोंबरे-पाटील व जनार्धनराव ठोंबरे-पाटील यांनी केले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ग्रामस्थ, माजी कृषी विद्यार्थी संघ व मित्र परिवार पुढाकार घेत आहेत.

# महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - **
अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर



विशेष



## द्विशा शर्मा प्रकरणात मोठी अपडेट!

## दुसरा पोस्टमॉर्टेम रिपोर्ट ३-४ दिवसांत, AIIMS कसा तयार करणार अंतिम अहवाल?

भोपाळ : द्विशा शर्मा मृत्यू प्रकरणात दररोज नवे खुलासे आणि प्रश्न समोर येत आहेत. आता सर्वांचे लक्ष द्विशा शर्माच्या दुसऱ्या शवविच्छेदन अहवालाकडे लागले आहे. मात्र हा अहवाल तात्काळ उपलब्ध होणार नसल्याची माहिती समोर आली आहे. दिल्लीतील एम्स रुग्णालयाच्या तज्ज्ञ पथकाने केलेल्या दुसऱ्या शवविच्छेदनानंतर अनेक महत्त्वाच्या वैद्यकीय आणि न्यायवैद्यक चाचण्या पार पाडल्या जाणार आहेत. यानंतरच अंतिम अहवाल तयार होणार असून त्यासाठी काही दिवसांचा कालावधी लागू शकतो.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, द्विशा शर्मा प्रकरणातील दुसरा शवविच्छेदन अहवाल लगेच जाहीर होण्याची शक्यता नाही. हा अहवाल तयार करण्यासाठी हिस्टोपॅथॉलॉजी (ऊतकविकृतीशास्त्र), अंतर्गत अवयवांची तपासणी, नमुन्यांचे प्रयोगशाळा विश्लेषण आणि इतर न्यायवैद्यक चाचण्या केल्या जाणार आहेत. मृत्यूमागील नेमके कारण शोधण्यासाठी या सर्व प्रक्रिया अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात. त्यामुळे अंतिम निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी वेळ लागणे स्वाभाविक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

### AIIMS दिल्लीच्या पथकाची पुढील प्रक्रिया काय असेल?

दुसरे शवविच्छेदन करण्यासाठी दिल्लीतील एम्स रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक भोपाळमध्ये दाखल झाले होते. शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर हे पथक सर्व महत्त्वाचे पुरावे सोबत घेऊन दिल्लीला परतणार आहे. यामध्ये घटनास्थळावरील पाहणी अहवाल, शवविच्छेदनादरम्यान घेतलेले फोटो, व्हिडिओ रेकॉर्डिंग, जैविक नमुने आणि इतर आवश्यक कागदपत्रांचा समावेश आहे. दिल्लीला परतल्यानंतर या सर्व पुराव्यांचे बारकाईने परीक्षण केले जाणार असून त्याच्या आधारे अंतिम अहवाल तयार करण्याची प्रक्रिया सुरू होईल.

### पहिल्या आणि दुसऱ्या शवविच्छेदन अहवालांची होणार तुलना

AIIMS च्या तज्ज्ञांकडून तयार करण्यात येणारा दुसरा अहवाल हा यापूर्वीच्या शवविच्छेदन अहवालाशी तुलना करून तपासला जाणार आहे. पहिल्या अहवालातील निष्कर्ष आणि दुसऱ्या शवविच्छेदनातील (Post-Mortem) निरीक्षणे यांचा परस्पर संबंध तपासला जाईल. याशिवाय शवविच्छेदनादरम्यान करण्यात आलेल्या व्हिडिओ रेकॉर्डिंगचे आणि छायाचित्रांचे सखोल विश्लेषण करण्यात येणार आहे. अहवालामध्ये कोणतीही त्रुटी राहू नये आणि तो न्यायालयीन प्रक्रियेसाठीही सक्षम ठरावा यासाठी कायदेतज्ज्ञांचाही सल्ला घेतला जाणार असल्याची माहिती मिळत आहे.

### अंतिम अहवाल ३ ते ४ दिवसांत येण्याची शक्यता

सर्व प्रयोगशाळा चाचण्या, नमुन्यांचे विश्लेषण आणि उपलब्ध कागदपत्रांची तपासणी पूर्ण झाल्यानंतर अंतिम अहवाल तयार करण्यात येईल. सूत्रांच्या माहितीनुसार, ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी सुमारे तीन ते चार दिवसांचा कालावधी लागू शकतो. हा अहवाल तपासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. मृत्यूचे नेमके कारण, त्यामागील परिस्थिती आणि इतर महत्त्वाचे पैलू स्पष्ट करण्यासाठी हा अहवाल निर्णायक ठरू शकतो.

### द्विशा शर्मा प्रकरणात आतापर्यंत काय घडले?

मिळालेल्या माहितीनुसार, ११ ते १२ मेच्या मध्यरात्री भोपाळमधील कटारा हिल्स परिसरातील राहत्या घरी द्विशा शर्माचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला होता. त्यानंतर १२ मे रोजी तिचे पहिले शवविच्छेदन करण्यात आले. मात्र, पहिल्या शवविच्छेदन अहवालाबाबत कुटुंबीयांनी अनेक शंका उपस्थित केल्या. यानंतर प्रकरणात एफआयआर दाखल करण्यात आला. विविध सामाजिक संघटना आणि कुटुंबीयांकडून आंदोलन करण्यात आले तसेच दुसऱ्या शवविच्छेदनाची मागणी जोर धरू लागली. अखेर २४ मे रोजी दिल्लीतील एम्सच्या तज्ज्ञ पथकाने भोपाळमध्ये येऊन दुसरे शवविच्छेदन केले. त्याच दिवशी द्विशा शर्मावर अंत्यसंस्कारही करण्यात आले.

### द्विशाच्या वैवाहिक आयुष्याचीही चौकशी सुरू

तपास यंत्रणांनी द्विशा शर्माच्या वैयक्तिक आणि वैवाहिक आयुष्याचाही तपास सुरू केला आहे. द्विशाने डिसेंबर २०२५ मध्ये समर्थ सिंग याच्याशी विवाह केला होता. दोघांची ओळख एका मॅट्रिमोनिअल वेबसाइटद्वारे झाली होती. दरम्यान, लग्नानंतरचे काही चॅट्स आणि संवाद तपास यंत्रणांच्या हाती लागल्याची माहिती समोर आली आहे. या संवादांमधून दोघांमध्ये काही मतभेद असल्याचे संकेत मिळाल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे तपास यंत्रणा या सर्व बाबींची सखोल चौकशी करत असून अंतिम शवविच्छेदन अहवालासोबतच इतर पुराव्यांचाही बारकाईने अभ्यास केला जात आहे. द्विशा शर्मा मृत्यू प्रकरणातील अंतिम अहवाल समोर आल्यानंतर या प्रकरणातील अनेक अनुत्तरित प्रश्नांची उत्तरे मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संपूर्ण देशाचे लक्ष आता AIIMS दिल्लीच्या अंतिम अहवालाकडे लागले आहे.

ई पेपर वाचा
सांज दैनिक बीड · वास्तव
http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com

# नीट पेपरफुटी प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने

## शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी :- डॉ.गणेश ढवळे

**बीड / प्रतिनिधी :** देशभर गाजत असलेल्या नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली बीडमधील विविध सामाजिक, राजकीय क्षेत्रातील नागरिक व सुजाण बीडकरांच्या वतीने सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर " शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिलाच पाहिजे" एनपीए प्रशासन मुर्दाबाद, भ्रष्ट शिक्षण व्यवस्था मुर्दाबाद, पेपरफुटी करणाऱ्यांची संपत्ती जप्त करा " आदी जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली.

या आंदोलनात एनटीए संस्था बरखास्त करावी, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा तसेच नीट पेपरफुटी प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांमार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशा मागण्या करण्यात आल्या.

आंदोलनकर्त्यांनी पेपरफुटीच्या सूत्रधारांवर कठोर कारवाई करून त्यांची संपत्ती जप्त करण्यात यावी तसेच पेपरफुटीमुळे नैराश्यात जाऊन आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणीही केली. जिल्हाधिकारी बीड यांच्यामार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री आणि मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र





फडणवीस यांना निवेदन पाठविण्यात आले. यावेळी आंदोलनात डॉ. गणेश ढवळे, शेख युनुस, रामनाथ खोड, मुबीन शेख, बाळासाहेब मोरे पाटील, किष्किंधा पांचाळ, सिताबाई भोसले, माजी सैनिक अशोक येडे, सय्यद सादेक, रामधन जमाले, शेख मुबीन, बाजीराव ढाकणे, प्राचार्य डी.जी.तांदळे, गणेश आजबे, नितिन जायभाये, राजु गायके, भिमराव कुंटे, कैलासचंद पालिवाल, रफीक पठाण, सुदाम तांदळे, शेख अमर, नितिन सोनावणे, कालिदास वनवे, आदी उपस्थित होते. डॉ. गणेश ढवळे यांनी सांगितले की, वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न पाहणारे लाखो विद्यार्थी रात्रंदिवस मेहनत घेत असताना कथित पेपरफुटी, निकालातील संशयास्पद बाबी आणि गैरव्यवहारामुळे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ झाला आहे. शिक्षण व्यवस्थेचे वाढते बाजारीकरण आणि प्रशासनाचा निष्काळजीपणा यामुळे अशा घटना वारंवार घडत असल्याचा आरोप त्यांनी केला.

एनटीए संस्थेने विश्वासार्हता गमावली असून ती तात्काळ बरखास्त करावी, दोषींवर कठोर कारवाई करून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी पारदर्शक व सुरक्षित परीक्षा प्रणाली लागू करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

## खळवट लिमगाव गाव आता सीसीटीव्हीच्या नजरेखाली; गुन्हेगारीला बसेल आळा!

➤ सरपंच गणेश अंबुरे यांचा सामाजिक पुढाकार

**➤वडवणी / प्रतिनिधी :** वाढत्या चोरी, घरफोडी तसेच जनावरे चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी खळवट लिमगाव ग्रामपंचायतीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत संपूर्ण गावात अत्याधुनिक सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित केली आहे. सरपंच गणेश अंबुरे ग्रामपंचायतीच्या वतीने सुमारे एक लाख रुपये खर्च करून उत्कृष्ट दर्जाचे ऑडिओ-व्हिडिओ सुविधायुक्त सात सीसीटीव्ही कॅमेरे गावातील महत्त्वाच्या ठिकाणी बसविण्यात आले आहेत.



गावातील मुख्य रस्ते, चौक, रहिवासी वस्ती तसेच मंदिर परिसर अशा संवेदनशील भागांमध्ये हे कॅमेरे लावण्यात आले असून त्यामुळे गावाच्या सुरक्षेला मोठे बळ मिळाले आहे. या उपक्रमामुळे गावात येणाऱ्या-जाणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवणे शक्य होणार असून गुन्हेगारी प्रवृत्तींवरही नियंत्रण येण्यास मदत होणार आहे. मार्च महिन्यात खळवट लिमगाव येथे अभिमान राऊत व हरिभाऊ राऊत यांच्या घरी मोठी चोरीची घटना घडली होती. या घटनेनंतर गावकऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आणि गाव सुरक्षित ठेवण्यासाठी ग्रामपंचायतीने पुढाकार घेत सीसीटीव्ही बसविण्याचा निर्णय घेतला.



या उपक्रमासाठी गावचे सरपंच गणेश अंबुरे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थांनी एकत्रितपणे सकारात्मक सहभाग नोंदवत हा उपक्रम यशस्वी केला. गावकऱ्यांच्या सहकार्यामुळे हा सुरक्षा प्रकल्प अल्पावधीत पूर्ण करण्यात आला. दरम्यान, सपोनि वर्षा व्हगाडे मॅडम पोलीस स्टेशन वडवणी खळवट निमगाव ग्रामपंचायतीच्या या उपक्रमाचे कौतुक करत इतर गावांनीदेखील गावाच्या सुरक्षेसाठी असा आदर्श घ्यावा, असे आवाहन केले आहे.

## रोटरी क्लबच्या पाणपोईचे गेवराईत छ.शिवाजी महाराज चौकात शुभारंभ संपन्न

**➤ गेवराई : प्रतिनिधी** सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या येथील रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या वतीने ग्रामीण भागातील पादचाऱ्यासाठी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात पिण्याच्या पाण्याची पाणपोई नुकतीच सुरू केली आहे. गेवराई तालुक्यातील विविध भागातील ग्रामस्थ विविध कामासाठी शहरात येत असतात. यावर्षी उन्हाळा अधिक तीव्र असल्याने पिण्याच्या पाण्याची गरज होती. रोटरी क्लबच्या संचालक मंडळ व सदस्य यांनी सेवा कार्य म्हणून विविध उपक्रम राबवत असतात. त्यातील हा एक उपक्रम राबविण्यात येत आहे. १५ मे २०२६ रोजी रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ चे गव्हर्नर रो. सुधीर लातुरे हे क्लब भेटीसाठी आले असता त्यांच्या हस्ते या पाणपोईचे उद्घाटन फीत कापून व रोटरी फलकाला पुष्पमाला घालून करण्यात आले. याप्रसंगी डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी डॉ.





राजगोपाल तापडिया, सहप्रांतपाल रो. कल्याण कुलकर्णी, रो. नितिन गोपन यांचे स्वागत बालाजी किराणाचे मालक सुरेश मानधने, रो. रामदास शिंदे, प्रा. रामप्रभु मुंडे, सेवानिवृत्त प्राचार्य रो. नागनाथ घसिंग यांनी केले. पिण्याच्या पाण्याची गरजवंत ग्रामस्थांना सोय क्लबने केली यासारखे पुण्य नाही. रोटरी क्लबच्या कार्याचे त्यांनी कौतुक केले. सूत्रसंचालन प्रा.राजेंद्र बरकसे यांनी केले. आभार सचिव रो. प्रविण जैन यांनी मानले. यावेळी रोटरी क्लब ऑफ गेवराईचे अध्यक्ष प्रा. राजेंद्र बरकसे, सचिव रो प्रविण जैन, सहसचिव डॉ नागनाथ मोटे, क्लब प्रशासक रो. गणेश कुलकर्णी, रो. राजेंद्र डेंगे, प्रोजेक्ट सर्विस चेअरमन धर्मराज करपे, राधाकिसन लड्डा यांच्यासह रोटेरियन व शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मनुर शिवारात पोलिसांचा छापा; कत्तलीसाठी ठेवलेले आठ गोवंश जप्त, दोघे जेरबंद



**➤ माजलगाव : प्रतिनिधी** माजलगाव शहरालगतच्या मनुर शिवारात माजलगाव ग्रामीण पोलिसांनी धडक कारवाई करत कत्तलीच्या उद्देशाने अवैधरित्या बांधून ठेवलेले आठ गोवंश जप्त केले. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून सुमारे तीन लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

माजलगाव ग्रामीण पोलिसांना मनुर परिसरात काही व्यक्तींनी गोवंश कत्तलीसाठी बेकायदेशीररीत्या ठेवले असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली होती. या माहितीची खातरजमा करून पोलीस निरीक्षक अशोक मुदीराज यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने शुक्रवारी दि. २३ मे रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास मनुर शिवारात छापा टाकला.

छापेमारीदरम्यान आठ गोवंशीय जनावरे गाय व बैल विना चारा बांधून ठेवलेली आढळून आली. जनावरांच्या संगोपनाबाबत कोणतीही योग्य व्यवस्था नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करत सर्व गोवंशाची सुटका केली. जप्त करण्यात आलेल्या जनावरांची अंदाजे किंमत सुमारे तीन लाख रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी अन्वर कुरेशी व सादेक जाहेद कुरेशी या दोघांविरुद्ध संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली आहे. जप्त केलेल्या गोवंशाची सुरक्षित व्यवस्था करण्यात आली असून प्रकरणाचा पुढील तपास माजलगाव ग्रामीण पोलीस करीत आहेत.

अवैध कत्तल व्यवसायाविरोधात पोलिसांनी केलेल्या या कारवाईचे परिसरातील नागरिकांकडून स्वागत होत आहे. अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांवर आळा घालण्यासाठी पोलिसांनी भविष्यातही कठोर कारवाई सुरू ठेवण्याचे संकेत दिले आहेत.

## पंढरपूरच्या अधिक मास सप्ताहासाठी आज बीड जिल्ह्यातून भाविकांचे प्रस्थान





**➤बीड / प्रतिनिधी :** श्रीक्षेत्र पंढरपूर येथे अधिक मासानिमित्त आयोजित ' फिरता तीर्थक्षेत्र अखंड हरिनाम सप्ताह, श्री ज्ञानेश्वरी पारायण व श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्या '**साठी बीड जिल्ह्यातील शेकडो भाविक आज ( दि. २५ ) सायंकाळी ६ वाजता वडवणी तालुक्यातील मोरवड येथील दत्त संस्थानातून प्रस्थान करणार आहेत.

संत भगवान बाबा व संत भीमसिंह बाबा यांच्या आशीर्वादाने सुरू असलेल्या या सप्ताहाचे यंदा पंढरपुरात आयोजन करण्यात आले असून, संत भीमसिंह बाबा यांचे शिष्य ह.भ.प. श्रीराम महाराज शेळके यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

सप्ताहात राज्यातील नामवंत कीर्तनकारांची उपस्थिती राहणार असून विविध धार्मिक कार्यक्रम, ज्ञानेश्वरी पारायण, भागवत कथा, कीर्तनसेवा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पंढरपूरला जाण्याची इच्छा असलेल्या भाविकांनी सायंकाळी ६ वाजता मोरवड येथे उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक श्रीराम महाराज शेळके यांनी केले आहे.

सर्वत्र होतेय कौतुक ➤ आर्या परिवाराने विशेष सन्मानचिन्ह प्रदान करून केला गौरव

## मंत्रमुग्ध करणाऱ्या सूत्रसंचालनाने जिंकली मने; अशोक वाडेकर सन्मानित

**➤ माजलगाव : प्रतिनिधी** प्रभावी वक्तृत्वशैली, ओजस्वी वाणी आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्वाच्या बळावर अनेक सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण करणारे छत्रपती संभाजीनगर येथे अशोकजी वाडेकर यांना आर्या परिवारातर्फे विशेष सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले.

आर्या परिवार आयोजित भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात अशोक वाडेकर यांनी केलेले उत्कृष्ट, प्रभावी आणि मंत्रमुग्ध करणारे सूत्रसंचालन उपस्थितांच्या विशेष पसंतीस उतरले. त्यांच्या ओघवत्या भाषाशैलीने, शब्दांतील ऊर्जा आणि विचारांतील समृद्धतेने संपूर्ण कार्यक्रमाला एक वेगळीच उंची प्राप्त झाली. कार्यक्रमातील प्रत्येक टप्पा त्यांनी आत्मविश्वासपूर्ण आणि आकर्षक पद्धतीने सादर करत उपस्थितांना खिळवून ठेवले.





सूत्रसंचालन ही केवळ कार्यक्रमाची जोडणारी कडी नसून कार्यक्रमाच्या यशाची महत्त्वाची बाजू असते. ही जबाबदारी अशोक वाडेकर यांनी अत्यंत प्रभावीपणे पार पाडल्याने संपूर्ण कार्यक्रम अधिक रंगतदार आणि संस्मरणीय ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. त्यांच्या सहज, प्रवाही आणि समर्पक निवेदनामुळे कार्यक्रमातील प्रत्येक क्षण अधिक जिवंत झाला. त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत आर्या ग्रुप ऑफ कंपनीजच्या वतीने त्यांना मानाचा सन्मान प्रदान करण्यात आला. हा सन्मान स्वीकारताना उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे अभिनंदन केले. यावेळी शिल्पा रणजीत राठोड यांनी अशोक वाडेकर यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचाही विशेष उल्लेख केला. विविध कार्यक्रमांमधून समाजप्रबोधनासह सांस्कृतिक जतनासाठी त्यांनी केलेल्या कार्याचे कौतुक करण्यात आले.

सूत्रसंचालन क्षेत्रात आपल्या प्रभावी शैलीमुळे विशेष ओळख निर्माण केलेल्या अशोक वाडेकर यांच्या या सन्मानाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.